# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com

जा.क्र. /गोंविग/कुसका/ ८३ /२०२५ दि. ०२/०१/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय: छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे आयोजित बोधचिन्ह प्रतियोगिता व निबंधस्पर्धेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात आनंद होत आहे की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे बोधचिन्ह प्रतियोगिता व निबंधस्पर्धा जाहीर करण्यात आलेली आहे. तद्अनुषंगाने पत्रासोबत सदर बोधचिन्ह प्रतियोगिता व निबंधस्पर्धेचे माहिती पत्रक संलग्नित करण्यात आलेले आहे.

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे जाहीर करण्यात आलेल्या बोधचिन्ह प्रतियोगिता व निबंधस्पर्धेमध्ये सहभागी होण्यास प्रेरित करावे ही विनंती.

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव

प्रतिलिपी:—

१) मा. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र—कुलगुरू कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र

**गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र आयोजित विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धा व केंद्राचे बोधचिन्ह प्रतियोगिता**



निबंध व केंद्राचे बोधचिन्ह स्विकारण्याची अंतिम तारीख

**३१ जानेवारी २०२५**

**छत्रपती शिवाजी महाराज एक प्रखर योद्धा, कुशल राज्यकर्ता, उदार व लोककल्याणकारी राजा, तर होतेच तसेच धवल चारित्र्याचे अधिपतीही होते. परस्त्रिला मातेचे स्थान देवून गौरव करणाऱ्या या व्यक्तीमत्वाची शिकवण असो किंवा अर्थकारण, समाजोपयोगी राजकारण, धर्माभिमान इत्यादी बाबींची शिकवण असो, महाराज म्हणजे या गुणांचे विद्यापीठ होय आणि तरुण पिढीमध्ये हे गुण रुजविणेच्या दृष्टिणे विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन व सर्जनशिलता यांना प्रोत्साहन देण्याकरीता या निबंध स्पर्धा व बोधचिन्ह प्रतियोगितेचे आयोजन करण्यात येत आहे.**

**आयोजक**
**प्रा. विकास चित्ते**
**समन्वयक, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र**

**निबंध स्पर्धेचे विषय :-**

१. छत्रपती शिवाजी महाराज : नेतृत्व आणि संघटनात्मक तत्वे
२. छत्रपती शिवाजी महाराज आणि कल्याणकारी राज्य.
३. 'हिंदवी स्वराज्य' अंतर्गत महसुल व नागरी प्रशासन यंत्रणा.
४. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि समकालीन भारतात त्याचे प्रतिबिंब.
५. छत्रपती शिवाजी महाराजांचे सुरत स्वारी : कारणे, उद्दिष्टे व परिणाम.
६. छत्रपती शिवाजी महाराज एक सामरिक नेते (लष्करी रणनिती, स्वदेशी संरक्षण उत्पादन, आधुनिक नौदलाचा पायाभरणी. इ. )

## निबंध स्पर्धा

**अटी व शर्ती :-**

१. ही निबंध स्पर्धा पदवी/पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.
२. निबंधाची शब्द मर्यादा कमीत कमी ५०० ते १००० शब्दांमध्ये असावा.
३. निबंध ए फोर (A4 size) झेराक्स पेपर हस्तलिखित स्वच्छ पांढऱ्या कागदावर लिहिलेला असावा.
४. मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तिन्ही भाषांमध्ये निबंध स्विकारल्या जाईल.
५. लेखी निबंध स्विकार केले जाईल.
६. निबंध लिहून झाल्यानंतर सगळ्यात शेवटी त्याच कागदावर आपले स्वत:चे पूर्ण नाव, वर्ग, महाविद्यालयाचे/विभागाचे आणि विद्यापीठाचे पुर्ण नाव न चुकता लिहणे आवश्यक आहे.
७. सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाईल.
८. परिक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वावर बंधनकारक राहिल.
९. निबंध स्विकारण्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी २०२५ आहे.
१०. ३१ जानेवारी २०२५ सांयकाळी ०६.०० वाजेपर्यंत आलेले निबंध स्विकारले जाणार नाही.
११. निबंध स्पर्धेचे निकाल जाहीर होत पर्यंत स्पर्धक आपले निबंध इतर कुठेही अगदी फेसबुकवर देखील प्रकाशित करु शकणार नाही.
१२. निबंधावर कोणाचा आक्षेप असल्यास स्पर्धा संयोजक जबाबदार असणार नाही.
१३. विजेत्यांचा निकाल विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
१४. निबंध जमा करण्यापूर्वी सर्वानी आपली नोंदणी करावी. व खाली दिलेल्या नोंदणी लिंक फार्ममध्ये आपला निबंध PDF च्या स्वरुपात अपलोड करावे. पुढील प्रमाणे आहे. https://forms.gle/1XMS3JitbKh9xTPf9

**निबंध स्पर्धेचे पारितोषिक**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | रु. ५,००० |
| द्वितीय क्रमांक | - | रु. ३,००० |
| तृतीय क्रमांक | - | रु. २,००० |

## बोधचिन्ह प्रतियोगिता

**नियम व अटी :-**

१. ही बोधचिन्ह प्रतियोगिता पदवी/पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.
२. बोधचिन्हांच्या मागील पेज वर आपले स्वत:चे पूर्ण नाव, वर्ग, महाविद्यालयाचे/विभागाचे आणि विद्यापीठाचे पुर्ण नाव न चुकता लिहणे आवश्यक आहे.
३. सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाईल.
४. परिक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वावर बंधनकारक राहिल.
५. बोधचिन्ह स्विकारण्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी २०२५, सांयकाळी ०६.०० वाजेपर्यंत असुन त्यानंतर आलेले बोधचिन्ह स्विकारले जाणार नाही.
६. विजेत्यांचा निकाल विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
७. नोंदणी लिंक पुढील प्रमाणे आहे. https://forms.gle/Ytg3DpqQJNhxcPXVA

**बोधचिन्ह प्रतियोगिता पारितोषिक**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | रु. ५,००० |
| द्वितीय क्रमांक | - | रु. ३,००० |
| तृतीय क्रमांक | - | रु. २,००० |